तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८ /३९८९

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 16 MAY 2019

प्रति

अध्यक्ष/सचिव,

सेंट मायकेल एज्युकेशन सोसायटी, विल्यम नगर, पुणे

**विषय - राज्यात सन २०१० मध्ये सुरु केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्वयंअर्थसहाय्य तत्वावर परवानगी (इरादा पत्र) देणेबाबत.**

**संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४)**

**२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.**

**३. शासन निर्णय एसएफएस-२०१९/प्र.क्र.३६३/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. ०८.०३.२०१९**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवून इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विना अनुदानित तत्वावर सुरू करण्याचे परिपत्रक काढले होते. तदनंतर महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनयमन) अधिनियम २०१२ राज्यात लागू झाला आहे. तथापि सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमा करिता प्रस्ताव दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासून राज्यात आजतागायत सुरू आहेत. सदर इंग्रजी शाळा हया बहुतांशीपणे शहरी भागात आहेत. त्यामुळे सदर शाळांना स्वयंअर्थसहाय्य तत्वावरील जागेबाबतच्या अटीचे पालन करणे अवघड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता सन २०१० पासून सुरू असलेल्या सेंट मायकेल एज्युकेशन सोसायटी, विल्यम नगर, पुणे संचलित सेंट मायकेल स्कूल, ६० फीट रोड, पिंपळे गुरव, पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून संदर्भ क्रं ३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी (इरादा पत्र) दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | सेंट मायकेल एज्युकेशन सोसायटी, विल्यम नगर, पुणे | सेंट मायकेल स्कूल, ६० फीट रोड, पिंपळे गुरव, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | प्राथमिक इ. १ ली ते ५ वी | २०१८-१९ |

**अटी व शर्ती :-**

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २०११ आणि त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, अधिनियम, शासन निर्णय, शासन परिपत्रक इ. मधील तसेच यापुढे यासंबंधी शासनाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या पुढील आदेशांचे पालन करणे त्याचप्रमाणे, भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधां उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित शाळांच्या संस्था चालकांवर राहील.

२ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ आणि त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, अधिसुचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक इ. पालन करणे बंधनकारक राहील

३. संबंधित शैक्षणिक संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थासोबत (जिल्हा परिषद/ महानगरपालिका/ नगरपलिका/ नगरपरिषदा/ कटक मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील. संबंधित शिक्षणाधिकारी यांचेकडे अशा करारपत्राची प्रत प्रथमतः यांचेकडे आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर मान्यता देण्यात यावी.

४. एका मुलासाठी एका वर्षासाठीचे शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार निर्धारित केलेले असावे.

५. संस्था किंवा शाळेबाबत आर्थिक अनियमिततेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

६ उपरोक्त बाबींची पुर्तता संबंधित शाळा करीत असल्यास या शासन निर्णयाच्या दिनांकापासुन **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा. त्यानुसार प्राप्त होणा-या प्रस्तावांची संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त निकषांची पुर्तता होत आहे किंवा नाही याची तपासणी करुन पात्र होणा-या शाळांची प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

७. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

८. यु-डायस डाटा- या शासन निर्णयान्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळाबाबत U-DISE (Unified District Infomation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित शाळा** म्हणून नोंद करावी. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

९. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१०. सदर संस्थेने रू ३००००/- किमतीचे नवीन चलन संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील, सदर बाबींची पुर्तता विहित वेळेत न केल्यास सदर परवानगी आदेश आपोआप रद्द करण्यात येतील.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी सदर शाळेस प्रथम मान्यता देताना उपरोक्त अटीची पुर्तता झाली किंवा नाही याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडून खात्री करूनच प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(मिनाक्षी राऊत)

प्र.शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

Scanned by CamScanner

राज्यात सन २०१० मध्ये सुरू केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस स्वयं अर्थसहाय्य तत्वावर परवानगी देणे बाबत
सेंट मायकेल एज्युकेशन सोसायटी, विल्यम नगर, पुणे संचलित सेंट मायकेल स्कूल, ६० फीट रोड, पिंपळे गुरव, पुणे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.२३७/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ८ मार्च, २०१९

संदर्भ -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-१०१०/(१४६/२०१०)/प्राशि-३, दिनांक २८/०५/२०१०
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-२०११/(१६२/२०११)/प्राशि-३, दिनांक २५/०९/२०१२
३) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) अधिनियम, २०१२, दिनांक ०४ जानेवारी, २०१३
४) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) अधिनियम, २०१२ (दुसरी सुधारणा) अधिनियम २०१३, दिनांक ०२ जुलै, २०१३
५) शासन आदेश, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-२०११/(१६२ अ/११)/प्राशि-३, दिनांक ३०/०८/२०१३
६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन), नियम, २०१६, दिनांक १३ एप्रिल, २०१६
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. इंमाशा-१७१४/ प्र.क्र.२५०/एसएम-२, दिनांक ३१ मे, २०१७

प्रस्तावना -

शासनाने दिनांक २८ मे, २०१० च्या परिपत्रकान्वये इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदान तत्वावरील खाजगी संस्थांमार्फत प्राथमिक शाळा सुरू करण्याचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. या जाहिरातीच्या अनुषंगाने एकूण ७४७५ अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जांची छाननी जिल्हास्तरीय समितीने केल्यानंतर राज्य स्तरीय समितीने प्राथम्यक्रम ठरवून ३११५ ठिकाणी शाळा सुरू करण्याच्या शिफारशी केलेल्या होत्या. सदर ३११५ शाळांचे प्रस्ताव मंत्री मंडळ उपसमितीच्या विचारार्थ सादर करण्यात आले होते. त्यानुसार मंत्रीमंडळ उपसमितीने दिलेल्या निर्णयानुसार या ३११५ शाळांच्या प्रस्तावामधील शाळांना परवानगी देण्याकरिता संदर्भाधीन दिनांक २५ सप्टेंबर,

Scanned by AnyScanner

२०१२ च्या शासन निर्णयान्वये निकष निश्चित करण्यात आले होते. शासन निर्णय दिनांक

सप्टेंबर, २०१२ मधील तरतुदीनुसार उपरोक्त प्रस्तावाची तपासणी करुन पात्र ठरणाऱ्या

शाळांचा प्रस्ताव शिक्षण संचालक(प्राथमिक),पुणे यांनी शासनास सादर केला होता.

२. दरम्यान, राज्यात महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ दिनांक ०४ जानेवारी, २०१३ पासून अंमलात आला होता. त्यामुळे सदर अधिनियम अंमलात येण्यापूर्वी जाहिरातीद्वारे मागविण्यात आलेले सर्व अर्ज रद्द करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३० ऑगस्ट, २०१३ रोजीच्या पत्रान्वये घेतला होता. तथापि, बऱ्याच संस्थांनी त्यांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळेल या आशेने शाळा सुरु केलेल्या आहेत.

३. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ राज्यात लागु झाला असल्याने सद्यस्थितीत कायम विना अनुदान तत्वावर शाळांना परवानगी देण्याचे धोरण नाही. परंतु कायम विनाअनुदान तत्वावर शाळेस परवानगी म्हणजे कोणतेही अनुदान केव्हाही देय नाही व स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्यात येणाऱ्या शाळांनादेखील कोणतेही अनुदान केव्हाही देय नाही हेच सुत्र लागू आहे. शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवून इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरू करण्याचे परिपत्रक काढले होते. तद्नंतर महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ राज्यात लागु झाला आहे. तथापि, सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमाकरिता प्रस्ताव दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासून राज्यात आजतागायत सुरू आहेत. सदर इंग्रजी शाळा ह्या बहुतांशपणे शहरी भागात आहे. त्यामुळे सदर शाळांना स्वयं अर्थसहाय्य तत्वावरील जागे बाबतच्या अटीचे पालन करणे अवघड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, सन २०१० पासून सुरु असलेल्या सेंट मायकेल एज्युकेशन सोसायटी, विल्यम नगर, पुणे संचलित सेंट मायकेल स्कूल, ६० फीट रोड, पिंपळे गुरव, पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

सेंट मायकेल एज्युकेशन सोसायटी, विल्यम नगर, पुणे संचलित सेंट मायकेल स्कूल, ६० फीट रोड, पिंपळे गुरव, पुणे या शाळेस (प्राथमिक, इयत्ता १ ली ते ५ वी, इंग्रजी माध्यम, राज्य मंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे. सदर शाळेने खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

Scanned by AnyScanner

अटी व शर्ती:-

I) सदर संस्थेने रु. ३०,००० किंमतीचे नवीन चलन संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील. सदर बाबींची पूर्तता विहित वेळेत न केल्यास सदर परवानगी आदेश आपोआपच रद्द समजण्यात येतील.

II) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम , २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम , २०११ आणि त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, अधिसूचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक इ. मधील तसेच यापूढे यासंबंधी शासनाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या पुढील आदेशांचे पालन करणे त्याचप्रमाणे , भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी , संबंधित शाळांच्या संस्थाचालकांवर राहील.

III) संबंधित शिक्षण संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत (जिल्हा परिषद/महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ कटक मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील. संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याकडे अशा करारपत्राची प्रत प्रथमत : आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर मान्यता देण्यात येईल.

IV) एका मुलासाठी एका वर्षासाठीचे शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार निर्धारित केलेले असावे.

V) संस्था किंवा शाळेबाबत आर्थिक अधिनियमिततेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

२. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

३. उपरोक्त बाबींची पूर्तता संबंधित शाळा करीत असल्यास या शासन निर्णयाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आता प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा त्यानुसार प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचे संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त निकषांचे पूर्तता होत किंवा नाही याची तपासणी करुन पात्र होणाऱ्या शाळांची प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

४. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या

Scanned by AnyScanner

ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

५. यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

६. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा -या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

1.आयुक्त, (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
2.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
3.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
4.शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
5.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
6.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे
7.निवडनस्ती (एसएम २).

Scanned by AnyScanner